
ISSN : 2278-9308

# Sanshodhan Samiksha

Humanities, Social Sciences, Commerce,
Education, Law and Language
Monthly Peer Reviewed International Research Journal

**Special Issue April - 2017**




- Chief Editor - Prof. Virag S. Gawande
- Editor - Dr. Sanjay J. Kothari
- Editor - Dr. Dinesh W.Nichit

- PUBLISHED BY -

AADHAR SOCIAL RESEARCH & DEVELOPMENT TRAINING INSTITUTE, AMRAVATI, MS.

CamScanner

# INDEX



| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Prof. Smita Mohod | The Mystical element in the poetry of Sri. Aurobindo | 1 |
| 2 | Kavya Shree .K.M<br>Dr. Manasa Nagabhushanamb | Impact of Information and Communication Technology (ICT) on Buying Decision Process among Generation Cohorts- A conceptual approach | 4 |
| 3 | Ku.Shital.H. Ujade. | Female Foeticide and Infanticide In Maharashtra-India. | 16 |
| 4 | Prashant .S.Thakre | Open Educational Resources In Modern Information Systeam And Role Of Libraries And Lis Professionals. | 22 |
| 5 | Dr. Ajay Patalbansi | Developing Communication Skills in the Students of Rural Colleges | 26 |
| 6 | Prof. J. D. Sangode | Dr. Ambedkar Thoughts on Currency | 32 |
| 7 | Mr. Maske Vishal Balajirao | Vision Of Tradition And Religion In Paulo Coelho's Pilgrimage | 34 |
| 8 | .Prof. Shardul K. Buva | The Role of Finance in Growth and Development "The study of Role of Finance in Exports" | 41 |
| 9 | डॉ.संजय ह. पाटील | पिटर सिंगर यांचे 'प्राणिहक्क तत्वज्ञान' : एक तात्विक विवेचन | 47 |
| 10 | प्रा.अशोक पुंडलीकराव चौधरी | जीएसटी चे फायदे व सामान्य नागरीकांवर परिणाम | 60 |
| 11 | प्रा. श्रीमती शिंदे सुरेखा सतीश | विषय : स्त्री-पुरूष समानतेसाठी समतावादी अभ्यासक्रमाची पुर्नरचना | 64 |
| 12 | प्रा.डॉ. उल्हास एन. राठोड | शेतकऱ्यांची आत्महत्या - एक समाजशास्त्रीय चिंतन | 73 |
| 13 | डॉ. एन. एल. चव्हाण | आर्थिक सुधारणाकालीन औद्योगिक विकासाचा आढावा | 82 |
| 14 | प्रा. मोरे भास्कर निवृत्ती | संत एकनाथ | 88 |
| 15 | प्रा. डी. एच. आडे | काळा पैसा | 92 |
| 16 | प्रा. डॉ. अमिता बन्नोरे | गडचिरोली जिल्हयातील आश्रमशाळेत शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास (वयोगट 6 ते 12 वर्षे) | 97 |
| 17 | डॉ. आर. पी. चौधरी | भारतीय शेतीची स्थितीगती | 103 |
| 18 | प्रा. मोहन बाबुराव चव्हाण | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य व शैक्षणिक योगदान | 108 |
| 19 | डॉ.एस.पी.देवरे | निती आयोग | 117 |

ISSN - 2278-9308

# संत एकनाथ

प्रा. मोरे भास्कर निवृत्ती
प्रमुख, मराठी विभाग, दादा पाटील महाविद्यालय, कर्जत, जिल्हा-अहमदनगर

**प्रास्ताविक :-** आपल्या समाजात पिढ्यान्‌पिढ्या अनेक प्रकारच्या अनिष्ट रुढी, प्रथा,परंपरा, संकुचित मनोवृत्ती यांचे प्राबल्य आढळते. अनेक प्रकारची कर्मकांडे केली जातात. पशुहत्त्या, व्रतवैकल्ये चालू आहेत. हे जर निमंत्रणात आणायचे असेल तर लोकजागर केल्याशिवाय पर्याय नाही हे सर्वच संतांनी ओळखले. संत ज्ञानेश्वरांपासून या प्रबोधनाची पहाट झाली. त्यांनी परमार्थविषयक लोकजागृतीला जन्म दिला. पंरतु ज्ञानेश्वरांनंतर सुमारे तीनशे वर्षांनी महाराष्ट्रातील लोकजीवनाला अज्ञानाच्या संकटाने अधिकच घेरले. समाजातील हे अज्ञान व शैथिल्य झटकून टाकण्यासाठी संत एकनाथ पुढे सरसावले. 'बुडती हे जन देखवेना डोळा' या कळवळ्यापोटी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनाचे पुनरुत्थान घडविण्यासाठी एकनाथ पुढे आले. ज्ञानेश्वरांनी उभारीला आणलेल्या भागवत धर्मात अधिक चैतन्य ओतण्याचे कार्य एकनाथांनी केले म्हणून बहिणाबाईंनी भागवत मंदिराचे चित्र रेखाटताना असे म्हटले आहे **'जनार्दनी एकनाथ | खांब दिला भागवत ||'** असे श्रेय एकनाथांना दिले आहे. भागवत धर्माच्या मंदिरात खांबाप्रमाणे आधार देण्याचे कार्य संत एकनाथांनी केले आहे. याहेतूने त्यांनी केलेली साहित्यनिर्मिती अतिशय मौलिक स्वरुपाची आहे. अध्यात्मातून मानवतावाद स्पष्ट करणे, जातीभेद रहित समाजमन घडविणे, स्त्री चा गौरव करणे, आदर्श गृहस्थाश्रमासंदर्भ उपदेश करणे आणि सर्वांना सद्‌गुणांची जोपासना करण्यास प्रवृत्त करणे हे संत एकनाथांच्या साहित्यसृष्टीतील विचारधन सदैव समाजप्रबोधन करीत आले आहे. यादृष्टीने संत एकनाथ हे एक समाजप्रबोधक संत आहेत.

**एकनाथांची साहित्य संपदा :-**

एकनाथाचे घराणे पैठणचे. एकनाथांना जन्मानंतर आईवडिलांच्या प्रेमाचे सुख फारसे लाभले नाही मात्र आजोबांनी त्यांचे पालनपोषण केले. प्राथमिक शिक्षणासाठी एका ब्राह्मण कुटुंबात पाठविल्यानंतर परमार्थ प्राप्तीची आस्था नाथांच्या ठिकाणी निर्माण झाली. पुढे गुरू जनार्दन स्वामींच्याकडे आश्रयाला राहत असता उपनिषदे, वेद ग्रंथ यांचा नाथंनी अभ्यास केला. गुरू जनार्दन स्वामींच्याकडेच वेदान्तविचार शिकून एकनाथांनी ते विचार पचविले. या वेदान्ताविचारांचा लोकोद्धारासाठी वापर करावा, हा विचार नाथांच्या मनात यावेळी येऊन गेला. पारमार्थिक अभ्यासातून व विचारातून एकनाथांनी १. चतु:श्लोकी भागवत २. एकनाथी भागवत, ३. रुक्मिणी स्वंयवर ४. भावार्थ रामायण ५. अभंग ६. गौळणी ७. भारुडे असे नानाविध प्रकारची पुष्कळ साहित्य निर्मिती केली आहे. लोकजागर करणे हा त्यांच्या या साहित्य निर्मितीचा प्रमुख हेतू दिसतो. माणसाला माणूस म्हणून जगण्यास समर्थ बनविणे, मानवतावाद शिकविणे, सत्य काय असत्य काय, विवेकहीन काय, ज्ञान काय, अज्ञान काय, साधक काय, बाधक काय या सर्व गोष्टींचा उलगडा एकनाथांनी जनसामान्यांच्या भाषेत, त्यांना पटेल अशा विचारातून स्पष्ट केला. आपल्या अभंग, गौळणी, भारुडे यातून लोकांचे मनोरंजन करता करता प्रबोधन केले. समाज सुखी, संपन्न, समर्थ, सुरक्षित सत्‌शिल आणि समंजस कसा होईल यासाठी प्रयत्न केले. एवढेच नाही तर स्वत: काही गोष्टींचे

अंगिकारही त्यांनी केला. त्यांच्याबाबतीत या संदर्भातील काही अख्यायिका प्रसिद्ध आहेत, उदा. पितरांच्या श्राद्धप्रसंगी अस्पृश्यांना भोजनास बोलावणे, चुकलेले अस्पृश्याचे पोर स्वतःच्या कडेवर घेऊन त्यांच्या वस्तीत नेऊन देणे, तुरुंगातून पळालेल्या गुन्हेगाराला आपल्या घरी ठेवून घेऊन त्याच्या आयुष्याला गती देणे, काशीहून रामेश्वरास चालविलेल्या गंगेच्या कावडीतील पाणी तहानेने तडफडत असलेल्या गाढवास पाजणे अशा अनेक अख्यायिका नाथांच्या संदर्भातील प्रसिद्ध आहेत.

'लोकासांगे ब्रह्मज्ञान आपण मात्र कोरडे पाषाण' ही ढोंगी पणाची वृत्ती त्यांच्या ठिकाणी नव्हती. म्हणून कृतिशील समाज प्रबोधक म्हणूनही संत एकनाथांचा उल्लेख करावा लागेल.

**मानवतावादी धार्मिक दृष्टिकोन :-**

एकनाथांच्या व्यक्तिमत्त्वात व्यक्तिविकास आणि समाजोद्धार या विचारांचा संगम होता. 'माणसाच्या मनाची सुयोग्य धारणा करतो तो धर्म' ही धार्मिक भूमिका त्यांच्या वृत्तीत व उक्तीत होती. आपल्या भागवत ग्रंथात एकादश स्कंधात एकत्व भावनेच्या संकल्पनेचा उल्लेख त्यांनी केला आहे. 'एकादशा' ची व्याख्या करताना ते म्हणतात, 'जेथे एक आणि एक' म्हणजे एकावर एक असतो, तो एकादश होय. तेथे 'एकच' असतो, तेथे दुजेपणाला थाराच नसतो. ही एकनाथांची एकत्वाची भावना त्यांचा उदारमतवादी दृष्टिकोन स्पष्ट करते. त्यांच्या धार्मिक विचारात एकच मानवतावादी दृष्टिकोन असल्याचे लक्षात येते. हा मानवतावाद स्पष्ट करताना एकनाथ आपल्या अभंगात म्हणतात,

**'पाहिजे समता सर्वांभूती भाव | मुंगी आणि राव सारखेचि |**
**एका जनार्दनी हेचि हातवटी | देवा तुझी भेटी तरीच होय ||'**

म्हणून काशीहून रामेश्वराला चालविलेल्या गंगेच्या कावडीतील पाणी तहानलेले तडफत असलेल्या गाढवास त्यांनी पाजले. सर्वांभूती एकच समतेचा भाव आणि प्राण पाहणारे एकनाथ हे या आपल्या कृतीतून सद्धर्माची शिकवण देतात. धार्मिक विचारांतून मानवतावादाची शिकविणे हे एकनाथांनी जण आपले जीवन व्रतच मानले होते.

**'गंगोदक ते पवित्र | येर कडू अपवित्र |**
**दोन्ही उदके ते सारखी | शुद्ध अशुद्ध काय पारखी |**
**गंगा देवापासून जाली | येर काय मध्यवर्ती केली |**
**शुद्ध अशुद्ध हे वासना | शरण एका जनार्दना ||'**

नाथांच्या मते ज्याचे अंतरंग शुद्ध, तो शुद्ध. मग त्याचा जन्म कोणत्या जातीत झाला त्याला महत्त्व नाही. माणूस म्हणून त्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली पाहिजे हा विचार पदोपदी त्यांच्या साहित्यातून जाणवतो. या संदर्भातील नाथांनी संतश्रेष्ठ चोखोबाचे सांगितलेले चरित्र समजावून घेण्यासारखे आहे. एकदा स्वर्गातील अमृतच नासले, तेव्हा इंद्रदेव चिंतेत पडले. अशावेळी नारदमुनींना इंद्रदेवांनी विचारले की, 'आता हे अमृत कोठे शुद्ध होईल?' तेव्हा त्यांनी सांगितले भूतलावर वैकुंठ आहे. तेथे संताच्या कीर्तनात स्वतः पांडुरंग नाचत असतात, तिथे हे अमृत शुद्ध होईल. इंद्रदेव एकादशीच्या दिवशी अमृतकुंभ घेऊन पंढरीस आले व विठ्ठलास ते अमृत शुद्ध करण्याविषयी विनंती केली. तेव्हा चोखोबांच्या घरी विठ्ठल कीर्तनात नाचत होते. चोखोबांकडे विठ्ठलाने अमृत शुद्धीची जबाबदारी दिली. तेव्हा

**"चोखियाची स्त्री चोखा दोघेजण |**
**शुद्ध अमृत तेणे केले देखा ||**
**चोखियाच्या घरी शुद्ध होय अमृत |**
**एका जनार्दनी मात काय सांगू ||"**

अस्पृश्य असणाऱ्या चोखोबांचा विठ्ठलावरील भाव शुद्ध होता म्हणूनच हे अमृत शुद्ध झाले.

**'चोखा डोंगा परी | भाव नव्हे डोंगा ||**
**काय भुललासी वरलिया रंगा ||'**

या चोखोबांच्या या संदर्भातील अभंगातून असे लक्षात येते की चोखोबांसारखी ज्याचे अंतरंग शुद्ध तो शुद्ध आणि पवित्र असतो. चोखोबांचा निर्मल भाव विठ्ठलाला कळला होता. अशीच मानवतावादी प्रतिष्ठा प्रत्येकाला प्राप्त झाली पाहिजे. हा विचार नाथांनी आपल्या साहित्यातून दिला. सारा समाज हा सुखी, संपन्न, समर्थ, सुरक्षित, सत्शील व समंजस कसा होईल हे नाथांनी आपल्या विचारातून सांगितले. सर्व जातीतील सर्व माणसांना आपल्या हृदयाशी धरले. प्रबोधित केले, त्यांना मानवी कल्याणाच्या विचारांची वाणी दिली. एकनाथांचे वाड्.मय म्हणजे लोकशिक्षण देणारे, अंधश्रद्धा निर्मूलन करणारे, अस्पृश्यता निवारण करणारे, स्त्रियांबद्दल आदर बाळगणारे भांडारच होय. आजही त्यांच्या या विचारांची देशालाच नव्हे तर जगालाही गरज आहे. असे विचार त्यांच्या काळात जसे महत्त्वाचे होते तसे आजही महत्त्वाचे आहेत. म्हणून एकनाथांचे वाड्.मय हे सार्वजनिक असे विचार मांडणारे आहेत.

**संसारिकांना उपदेश :-**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात जसे धार्मिकतेला महत्त्व आहे, तसेच महाराष्ट्राच्या कौटुंबिक जीवनातही आहे. मराठी लोकसंस्कृतीवर भागवतधर्माचा मराठी संताच्या उपदेशाचा खूप मोठा प्रभाव आहे. या प्रभावातून मराठी माणसांच्या नैतिकतेची जडण घडण झालेली आहे. या दृष्टीने नाथांच्या गौळणी, भारुडे अभ्यासण्यासारखी आहेत. खोडकर कृष्णाबद्दल गौळणी यशोदेकडे तक्रार करतात. याविषयी एकनाथ आपल्या गौळणीत लिहितात-

**"कवाड भ्रांतीचे उघडिले | कुलूप मायेचे मोडिले |**
**शिंके अविद्येचे तोडिले | बाई तुझिया कृष्णे ||"**

ही गौळणींची कृष्णाबद्दलची तक्रार अध्यात्मिक आहे, पंरतु ते अध्यात्म नित्य व्यवहारात किती सहजपणे येते आणि आपल्याला उपदेश देऊन जाते हे अभ्यासल्यानंतर लक्षात येते. यातून आपल्या भ्रांतीची कवाडे उघडीली जातात, मायेचे मर्यादित कुलूप मोडून ते सर्वव्यापी होते. अविद्येचे शिंके तोडणे, दंभाचा डेरा फोडणे आणि आपल्याला प्रबोधित करण्यासंदर्भातील जाणिवा देणे हा एकनाथांचा हेतू स्पष्ट दिसतो.

नाथांची भारुडे ही भक्तिरसांचे घुटके पाजणारे आहेत हे खरे आहे; परंतु या भक्तित परमार्थाबरोबरच संसारिकांना उपदेश आहे. उदा. सासुरवास या भारुडातील सून आपला सासरा (अहंकार) आणि सासू (कल्पना) यांच्या सासुरवासाला कंटाळून गावी गेलेला सासरा तिकडेच खपू दे, आणि सासूला मरिआई येऊ दे, अशी इच्छा व्यक्त करते. 'विंचू' भारुडातील 'विंचू' हा खरा विंचू नसून तो कामक्रोधरुपी विंचू आहे. खरा विंचू चावल्याने जेवढ्या वेदना होतात, तेवढ्याच वेदना कामक्रोधानेही होतात हे अतिशय साध्या सोप्या भाषेतून एकनाथ सांगतात. लोकांना रुचेल, पचेल अशा साध्या सोप्या लोक समजूतीतील

ISSN - 2278-9308
उदाहरणे एकनाथांच्या भारुडात व साहित्यात येतात. त्यामुळे अध्यात्माबरोबरच प्रापंचिक वा वैयक्तिक गोष्टीही समजायला मोठी मदत होते. लोकोद्धार करायचा असेल तर लोकांची भाषा यायला हवी, लोकसंस्कृतीचे उपासक व त्यांचा उपदेश समजायला हवा. या संदर्भातील एकनाथांचे निरीक्षण खूपच सूक्ष्म असे होते. याचा प्रत्यय त्यांच्या भारुडातून येतो. उदा. भल्या पहाटे धर्म जागवीत येणारा अरुणाचा प्रतिनिधी पांगूळ, सूर्योदयाच्या वेळी अलगूज घुमवून कृष्णाची गीते गाणारा वासुदेव, संबळ वाजवून देवीच्या नावाने गोंधळ घालणारा गोंधळी हे एकनाथांच्या भारुडांचे विषय आहेत. लोकांच्या भाषेत, लोकजीवनातील उदाहरणे देऊन एकनाथांनी आध्यात्माबरोबरच प्रापंचिक उपदेश केला. सांसारिकांनी कसे असावे आणि कसे नसावे हे सांगितले. एकूणच काय तर एकनाथांनी आपल्या वाङ्‌मयाद्वारे दूरदर्शीपणाने सुसंस्कारित विचारांचे बिजारोपण केल्याचे स्पष्ट जाणवते.

**समारोप :-**

आज 'जनसेवा हीच खरी ईश्वरसेवा' असे आपण म्हणतो तो विचार, 'जनी जनार्दन एकनाथ' या शब्दांत एकवटलेला दिसतो. जन म्हणजे सर्वजन त्यात सर्व जातीचे लोक आले. जनार्दन म्हणजे जन कल्याणविषयीची तळमळ बाळगणारा तो एकनाथ. गुरू (जनार्दन स्वामी) आणि शिष्य (एकनाथ) दोघेही जनमाणसात, प्राणिमात्रात देव पाहणारे, जनतेचे कल्याण हा विचार बाळगणारे एका विचाराचे संत आहेत. समाजमनात शेकडो वर्षे रुजलेल्या अनिष्ट चालीरीती प्रथा, परंपरा, अज्ञान नष्ट करण्यासाठी इतर संतांप्रमाणेच संत एकनाथांनीही आपल्या साहित्याद्वारे लोकजागृती करण्याचे कार्य केले. त्यांच्या साहित्यातील विचारधन हे संस्कारक्षम आहे. मानवतावादी विचार मांडणारे आहे. त्यांचे विचार सार्वकालिक प्रबोधन करणारे आहेत. या हेतूने संत एकनाथ हे एक समाज प्रबोधक संत आहेत.

**संदर्भ :-**


१) ल.रा. नसिराबादकर, प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास
२) गं.बा. सरदार, संत वाङ्‌मयाची सामाजिक फलश्रुती
३) न.र. फाटक, श्री. एकनाथ : वाङ्‌मय आणि कार्य
४) रा.तु. भगत, संतसाहित्य आणि समाजप्रबोधन
५) ल.रा. पांगारकर, मराठी वाङ्‌मयाचा इतिहास खंड १ ला